# ३) सरस्वती

**ह. भ. प. श्री. सुभाष महाराज गेठे**

**आतां अभिनव वाग्विलासिनी। जे चातुर्यार्थकलाकामिनी ।**
**ते शारदा विश्वमोहिनी । (नमिली) नमस्कारिली मियां।।२१।।**

अ.१

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायाच्या पहिल्या २० ओव्यांच्या मध्ये भगवान गणेशांचे वर्णन संपूर्ण वेद, पुराण, स्मृती, काव्य, नाटके इत्यादींच्या रूपाने केले आहे. गणपती ही बुद्धीची देवता आहे. गणपतीचे वर्णन झाल्यानंतर लगेचच श्री ज्ञानेश्वर महाराज २१ व्या ओवीत सरस्वती मातेचे वर्णन करून नमन करतात.

**ओवीचा अर्थ :** आता जी वाणीची अपूर्व क्रीडा करणारी असून, चातुर्य, वागर्थ व कला यांची देवता आहे व जिने सर्व जग मोहून टाकले आहे त्या सरस्वती देवीस वंदन करतो.

सरस्वती देवी ही विद्येची, बुद्धिचातुर्य, स्मृती, संगीत, भाषण तसेच कलेची अधिष्ठात्री देवता मानली जाते. सरस्वती देवीला शारदा, शतरूपी, सावित्री, विणावादिनी, विणापाणि, वाग्देवी, वागेश्वरी व भारती इत्यादी नावाने ओळखले जाते. सरस्वती माता शुभ वस्त्र नेसलेली आणि कमळावर आरुढ झालेली आपण पाहतो. तिचे वाहन मोर किंवा हंस आहे, हातात वीणा आहे, हातात स्फटिकांची माळा आहे. सरस्वती देवीचे वर्णन खालील प्रमाणे केले जाते...

**या कुन्देन्दुतुषारहारधवला या शुभ्रवस्त्रावृता।**
**या वीणावरदण्डमण्डितकरा या श्वेतपद्मासना।।**

**या ब्रह्माच्युत शंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता।**
**सा मां पातु सरस्वती भगवती निःशेषजाड्यापहा।।**

जी विद्येची देवता सरस्वती, तिचा रंग चमेली फूल, चंद्र, हिमराशी व मोत्याच्या हाराप्रमाणे शुभ आहे. जिच्या हातामध्ये वीणा शोभून दिसतो आणि जी पांढऱ्या कमळावर आसनस्थ झालेली आहे. तसेच ब्रह्मदेव, विष्णू आणि शंकर अशा देवतांकडून जी सदा/नेहमी पूजली जाते, ती सर्व जाड्यता रूपी अज्ञानाचा नाश करणारी सरस्वती देवी माता आमचे रक्षण करो.

संपूर्ण विश्वातील ध्वनी हे सरस्वती देवीच्या अभिव्यक्तीचेच प्रतीक आहे. ही ब्रह्मदेवाची कन्या म्हणून ओळखली जाते. वसंत पंचमी ही सरस्वती देवीची प्रकट तिथी मानली जाते.

या सृष्टी आरंभी सरस्वती देवीच्या वीणा वादनाने चराचरांमध्ये नाद/ध्वनी अभिव्यक्त झाला. सर्वांच्या मध्ये शब्द आणि रस यांची अभिव्यक्ती झाली म्हणूनच हिला सरस्वती असे नाव प्राप्त झाले.

**वीणा :** सरस्वती देवीने हातात धारण केलेला वीणा हा संगीत आणि कला यांचे अभिनव प्रतीक आहे. अनेक ज्येष्ठ–श्रेष्ठ कवी या सरस्वती देवीच्या उपासनेद्वारेच प्रसिद्धीला प्राप्त झालेले आहेत. उदा महाकवी कालिदास, वरदराजाचार्य इत्यादी.

**ग्रंथ :** सरस्वती देवीने आपल्या एका हातात ग्रंथ धारण केलेला आहे. तो ग्रंथ समग्र ज्ञानाचे प्रतीक आहे. म्हणून आपण ग्रंथालाही सरस्वती समजतो आणि त्याची आदराने निगा ठेवतो.

**स्फटिकमाला :** सरस्वती देवीने आपल्या एका हातात स्फटिकमालाही धारण केली आहे. ही माला ईश्वरनिष्ठा, अभ्यासातील सातत्य, निरंतरता, दीर्घकालकता आणि आदर इत्यादी सद्गुण दर्शविते.

**हंस :** हंस हा विवेकाचे प्रतीक आहे. ज्याप्रमाणे दूध आणि

पाणी यांचे मिश्रण असेल तर हंस हा दूधाचेच ग्रहण करतो आणि पाणी टाकून देतो. हा विवेक हंसांच्या चोचीत निसर्गदत्त आहे. तसेच आपणही योग्य-अयोग्य, खरे-खोटे, सत्य-असत्य अशा द्वंद्वाची प्रचिती प्राप्त झाली असता जे योग्य, सत्य, शाश्वत व मंगलमय आहे, त्याचाच स्वीकार करावा. बाकीच्यांचा आपल्या बुद्धी-विवेकाने त्याग करावा.

**श्वेत वस्त्र :** श्वेत वस्त्र हे सात्त्विकतेचे प्रतीक आहे. आपण परिधान केलेले वस्त्र हे आपल्या स्वभावाचे, अभिरुचीचे आणि मनोवृत्तीचे प्रतीक असते. सात्त्विक वस्त्र हे परिधान करणाऱ्यालाही



मंगल आणि आनंददायी असते. अत्यंत भडक, रंगी-बेरंगी आणि काळेकुट्ट वस्त्र हे रजोगुणांचे व तमोगुणांचे प्रतीक आहे. शुभ वस्त्र हे सात्त्विक गुणांचे, ज्ञानाचे व अभिरुचीचे प्रतीक आहे.

**श्वेत कमळ :** श्वेत कमळ हे अलिप्तता, निर्लेपता आणि असंगता याचे प्रतीक आहे. श्वेत कमल पुष्प पाण्यातून उदयाला येते आणि पाण्यातच राहते, परंतु पाण्याने ओले होत नाही. त्याप्रमाणे आपण जीवन जगताना, विविध परिस्थितीत जगत असताना त्या परिस्थितीचा, परिस्थितीच्या गुणांचा, दोषांचा परिणाम आपल्या मनावर होऊ न देता निर्विकारतेने जगण्याचे मूल्य कमळाकडून आपल्याला शिकता येते.

**शुक्लां ब्रह्मविचारसारपरमामाद्यां जगद्व्यापिनीम्।**<br>**वीणा-पुस्तक-धारिणीमभयदां जाड्यान्धकारापहाम्।**<br>**हस्तेस्फटिकमालिकां विदधतीं पद्मासने संस्थिताम् ।**<br>**वन्दे तां परमेश्वरीं भगवतीं बुद्धिप्रदां शारदाम्।।**

जी सरस्वती माता जी की शुभ्र वर्णाची, संपूर्ण विश्वव्याप्त, आदिशक्ती, परब्रह्माच्या विषयासंबंधी केला गेलेला विचार आणि चिंतन या सर्वांचे परमोच्च सार धारण करणारी, अभय प्रदान करणारी, अज्ञानरूपी अंधकार दूर करणारी, हातामध्ये वीणा, ग्रंथ आणि स्फटिक माला धारण करणारी तसेच पद्मासनामध्ये बसून सर्वांना बुद्धी प्रदान करणारी, अशा सर्व ऐश्वर्याने अलंकृत असणाऱ्या शारदा मातेला मी वंदन करतो.

अध्ययनाला सुरुवात करण्यापूर्वी सरस्वती मातेचे स्मरण आणि वंदन करून प्रारंभ करावा, अशी प्राचीन ऋषीमुनींची परंपरा आहे.

**सरस्वती नमस्तुभ्यं वरदे कामरूपिणी ।**<br>**विद्यारम्भं करिष्यामि सिद्धिर्भवतु मे सदा।।**

दैनंदिन व्यवहारामध्ये आपण जे शब्द वापरतो ते सरस्वती देवीचे

प्रतीक असल्यामुळे जपून आणि विचारपूर्वक शब्द वापरावे. आपल्या शब्दाला जगण्याचा आधार असावा. आपल्या शब्दात दुसऱ्याला दुःख देणारी धार नसावी.

**जरी प्रकटे सिद्धसरस्वती। तरी मुकयाहि आथी भारती।**
**एथ वस्तुसामर्थ्यशक्ति । नवल कायी।।७८।।** अ. १

श्री संत ज्ञानेश्वर महाराज सरस्वती मातेचे एक वेगळे वैशिष्ट्य सांगतात एखाद्या मुक्या माणसाने जरी सरस्वती मातेची प्रार्थना, आराधना, उपासना श्रद्धापूर्वक केली तर सरस्वती माता त्याच्या वाणीत प्रकट होऊन तोही चांगला बोलू शकतो. ही सरस्वती देवी पूजनाची वस्तू सामर्थ्य शक्ती आहे, म्हणून सरस्वती देवीची प्रार्थना करावी.

सरस्वतीच्या प्रसन्नतेने मुका मनुष्य सुद्धा इतका चांगला बोलू शकतो की तो प्रत्यक्ष ब्रहस्पतीशी सुद्धा पैजेने बोलू शकतो.

**जी आपुलिया स्नेहाची वागेश्वरी । जरी मुकेयातें अंगिकारी ।**
**तो वाचस्पतीशी करी । प्रबंधुहोडा।।८।।** अ. १०

सरस्वती देवी ही विविध वाङ्‌मयाच्याद्वारे सर्व साहित्य ग्रंथात कवींच्या कल्पनांच्याद्वारे संपूर्ण साहित्य विश्वाला व्यापून आहे. (उदाहरणार्थ: श्री वेद व्यास आणि त्यांची साहित्य कृती महाभारत)

**ना तरी सकळ धर्मांचे माहेर । सज्जनांचे जिव्हार ।**
**लावण्यरत्नभांडार । शारदेचें।।३१।।**
**नाना कथारूपे भारती। प्रकटली असे त्रिजगतीं ।**
**आविष्करोनि महामतीं। व्यासाचिये।।३२।।** अ. १